**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०२ यांची शपथेवर साक्ष सुरू**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | इलियाज कासम शेख |
| वय | : | ६६ वर्षे |
| व्यवसाय | : | काही नाही. |
| राहणार | : | युसुफ कॉम्पलेक्स, रुम नं.२०४ ता.जि.पालघर |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती आशा मारवाडी यांचेमार्फत**

मी आरोपीला ओळखतो. तो माझा भाऊ आजिस शेख याचा मुलगा आहे. मी सुभान यास म्हणत होतो की, जनावर चोरीचा धंदा करु नको. याचा राग धरुन त्याने मला शिवीगाळ केली व माझ्या मागे कोयता घेऊन माझा पाठलाग केला. त्यानंतर दिनांक ०२.०४.२०२२ रोजी मी व माझी पत्नी धार्मिक कार्यक्रमाकरीता माझा भाऊ शरीफ शेख याच्या घरी टेन या गावात असतांना सकाळी ११.३० वाजता त्या दिवशी सुभान शेख याने मला शिवीगाळ केली. तो मला मारायला धावु लागला आणि त्याने मला उचलुन जमिनीवर आपटले. त्यामुळे माझ्या मनक्याला मार लागला होता. मनोर येथील सरकारी दवाखान्यामध्ये उपचाराकरीता दाखल केले होते आणि त्यानंतर बोईसर येथील आनंद हॉस्पीटल मध्ये पुढील उपचाराकरीता दाखल केले. तेथे माझा डॉक्टरांनी एक्स-रे काढुन माझा मणका तुटला असल्याचे सांगितले. डॉक्टरांनी मला तीन महिने बेड रेस्ट करावी लागेल असे सांगितले होते. त्यामुळे मी तीन महिने बेडवरच होतो. पोलीसांनी घटनेबाबत माझ्याकडे विचारपुस करुन माझे बयाण नोंदवले होते. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी करीता विद्वान वकील यांचा वारंवार ०१.४० वाजेपर्यंत पुकारा केला असता गैरहजर.**

**आरोपी यांचा ०१.४० वाजेपर्यंत पुकारा केला असता गैरहजर.**

**वरील साक्षीदाराचा साक्षीपुरावा फौ.प्र.सं. कलम ३०९ प्रमाणे नोंदविण्यात आला.**

**आरोपी व त्यांचे वकील गैरहजर असल्यामुळे उलटतपास नाहीचा आदेश.**

समक्ष,

GAJBHIYE YOGESH HARIDAS
Digitally signed by GAJBHIYE YOGESH HARIDAS
Date: 2025.11.15 14:44:42 +0530

(यो. ह. गजभिये)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.४, पालघर
दिनांक : १५.११.२०२५

श्रवणोत्तर स्विकृत,

GAJBHIYE YOGESH HARIDAS
Digitally signed by GAJBHIYE YOGESH HARIDAS
Date: 2025.11.15 14:44:46 +0530

(यो. ह. गजभिये)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
न्यायालय क्र.४, पालघर